# वात्सल्य

## माय दे देऊस चर्च, पाली

रविवार ३१ ऑक्टोबर २०२१

## सिनडचा अधिकृत लोगो व त्याचे स्पष्टीकरण

**विषय :**
सहप्रवासात्मक ख्रिस्तासभेसाठी
एकात्मता, सहभागिता
व प्रेषितकार्य

**सिनडचा कार्यकाल :**
ऑक्टोंबर २०२१
ते
ऑक्टोंबर २०२३




* आकाशाला भिडणारे एक मोठे, भव्य वृक्ष जे ख्रिस्ताच्या क्रुसाचे प्रतीक दर्शविते.

* त्याच्या केंद्रस्थानी ख्रिस्तशरीर आहे, जे सूर्याप्रमाणे चमकते.

* ह्या वृक्षाच्या आडव्या फांद्या उघडलेल्या हाताप्रमाणे किंवा पंखाप्रमाणे सर्वांना कवटाळणाऱ्या पवित्र आत्म्याचे प्रतीक दशवितात.

* संपूर्ण मानवजातीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या १५ लोकांच्या प्रतिमा लोगोमध्ये दाखवल्या आहेत, जे 'एकत्रपणे चालत आहेत' - बिशप, धर्मगुरु आणि धर्मभगिनी लोकांपुढे नव्हे, तर लोकांसमवेत चालत आहेत.

# सिनड म्हणजे काय?

सिनड (Gk) = सहप्रवास (Greek: σύνοδος [ˈsinoðos] meaning "assembly" or "meeting")
"सहप्रवास", आपण शिकून घ्यावे आणि परिवर्तीत व्हावे

- प्राचीन आणि वंदनीय (Venerable) शब्द.
- जसा येशू मार्ग आहे तसे ख्रिस्तीजनांना 'मार्ग' म्हणत असत (प्रे. कृ. ९:२; १४.२२)
- संत जॉन क्रिजोस्तोम सांगतात की, "चर्च आणि सिनड हे समानार्थी" आहेत.
- बाप्तिस्मा स्वीकारलेले हे ख्रिस्ताच्या याजक, संदेष्टा आणि राजा ह्या तिहेरी कार्यात सहभागी होतात.
- दुसरी विश्व व्हॅटिकन परिषदेनंतर अलीकडील सिनड ही पोप साहेबांसाठी सल्ला देणारी संस्था.

## सिनड २०२१-२०२३ चे प्रयोजन काय आहे?

1. देवाच्या प्रेमाचे साक्षीदार होणे.
2. परिघाबाहेर राहणाऱ्या लोकांचे ऐकणे / श्रवण करण्यासाठी ख्रिस्तसभेमध्ये सहभागिता आणि सर्वसमावेशक प्रक्रिया राबविणे
3. ख्रिस्त सभेत असलेली संपत्ती आणि विविध दानाची ओळख करून घेणे
4. प्रेषितीयकार्यात सहभागी होण्याचे नवनवीन मार्ग उघड करणे
5. ख्रिस्त सभेची जबाबदारी आणि अधिकार ह्याचे परिक्षण करणे.
6. सर्वधर्मीय संवादासाठी एक विश्वासू सहकारी म्हणून ख्रिस्तसभेला मदत करणे (श्रद्धा आणि इतर ख्रिस्तीजन), चांगल्या जगासाठी बंधुत्व, अंतर्भाव, सहभागिता आणि बंधुत्व.
7. बहुमतीय विचाराची चर्चा होताना एककेंद्राभिमुखता तत्वानुसार अल्प लोकांच्या मताला महत्व देण्यात यावे
8. ख्रिस्तसभेचा नवा "सहप्रवास, सहप्रवासात्मक" मार्गाची ओळख करुन घेणे.

**अधिक माहिती जमा करणे, हे या सिनडचे प्रयोजन नाही. उलट, हेतू हा की,...**

ज्या ख्रिस्त सभेसाठी आपणास पाचारण झाले आहे त्याचे स्वप्न पाहण्यास प्रेरित करणे
लोकांच्या आशा उंचावणे, श्रद्धेला उत्तेजन देणे, जखमा बांधणे, नविन आणि भक्कम नातेसंबध जोडणे,
एकमेकाकडून शिकणे, नाती जोडणारे पुल बांधणे, मन प्रकाशित करणे, अंत:करण उजळविणे,
सामाईक मिशन कार्यासाठी आपले बळकट करणे.

सिनडमध्ये कोण सहभागी होऊ शकतात? उत्तर : बाप्तिम्जा झालेला प्रत्येक भाविक आणि देवाची सर्व लेकरे जे कॅथॉलिक श्रद्धेतून इतर ख्रिस्ती श्रद्धेत गेले आहेत (इतर पंथीय), सर्व इतर धर्मीय भाविक जे देवाला धर्माला मानत नाहीत, आणि विशेषकरून जे गरीब, उपेक्षित आणि मुख्य प्रवाहापासून दूर असलेले लोक ह्या सिनडमध्ये सहभागी होऊ शकतात.



**दोन पायाभूत प्रश्न :**

१. सहप्रवासी ख्रिस्तसभा (Synodal Church) शुभवर्तमानाची घोषणा करताना एकत्रितपणे प्रवास करते. आपल्या स्थानिक ख्रिस्तसभेत (धर्मग्रामात / गावात) आज हा "एकत्रित प्रवास" (Walking together) कशा प्रकारे केला जातो?
२. एकत्रितपणे प्रवास करण्यासाठी पवित्र आत्मा आपल्याला कोणती पावले उचलण्यास आवाहन करीत आहे?

सिनड ऑक्टोबर २०२१ ते २०२३

# गावपरिवारातील अधिवेशन (रुपरेषा)

सिनडचा विषय : **सहप्रवासातील ख्रिस्तसभा :** (एकात्मता, सहभागिता व मिशनकार्य)

**प्रवेश गीत :** पवित्र आत्म्या ये झणि ये ***किंवा*** पवित्र आत्मा प्रभू येशू के चरण मे...

**बायबल वाचन :** प्रेषितांची कृत्ये : १०:२३ ते ४७ ***किंवा*** लुक : २४:१३ ते ३५

**सिनडसाठी प्रार्थना**

**बोधचिन्हाचे स्पष्टीकरण**

**सिनडचे स्पष्टीकरण**



* सिनड म्हणजे ग्रीक भाषेत एकत्र चालणे.
* सिनड ही प्रक्रिया आहे, एखादी घटना नाही.
* ही एक आध्यात्मिक प्रक्रिया आहे.
* ह्या प्रक्रियेत एकत्र येणे, ऐकणे व पारख ह्यांना प्राधान्य दिले जाते.
* आपण एकमेकांचे ऐकूण, पवित्र आत्म्याचे देखील ऐकावे.
* ही सिनड प्रक्रिया इतर सिनड प्रक्रियेपेक्षा वेगळी आहे. ह्या प्रक्रियेमध्ये सुरुवातीपासून आपला सहभाग महत्त्वाचा आहे. आज आपण आपली भूमिका योग्य प्रकारे मांडण्यासाठी एकत्र जमलो आहोत. आपण चर्चा करण्यासाठी नव्हे तर आपले अनुभव कथन करण्यासाठी जमलो आहोत, म्हणून सर्वांनी सहभागी होऊन, मनमोकळेपणाने बोलावे.

## गट चर्चेसाठी प्रश्न

**१) आपल्या धर्मग्रामात/गावपरिवारात एकत्रित प्रवास कशा प्रकारे घडत आहे ?**

**२) एकत्रित प्रवास वाढविण्यासाठी कोणती पावले उचलण्यास पवित्र आत्मा आपणांस प्रेरणा देतो ?**

ह्या दोन पायाभूत प्रश्नावर आपण पुढील मुद्द्यांपैकी कोणत्याही विषयावर आपले अनुभव कथन करावे. हे अनुभव कथन करताना आपल्याला झालेला आनंद, भेडसावणारे प्रश्न, सामोरे जावे लागणारे अडचणी व अडथळे, अनुभवलेल्या जखमा त्यातून व्यक्त कराव्यात.

## सहप्रवासातील ख्रिस्तसभा या संदर्भात प्रश्न

१. ख्रिस्ती श्रद्धावंतांची सहप्रवासासाठी जडणखडण कशा प्रकारे केली जाते ?

२. 'आमची ख्रिस्तसभा' असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा त्यात सर्वांचा (गोरगरीब) सहभाग असतो का?

३. इतर धर्मियांशी आपले संबंध कसे आहेत?

४. इतर ख्रिस्ती पंथियांशी नातेसंबंध कसे आहेत?

## ऐकणे व बोलणे या संदर्भातील प्रश्न

**५.** आपल्या पॅरिशमध्ये / गावपरिवारात कोणाकोणाचे ऐकले जाते आणि कशा प्रकारे ऐकले जाते?

**६.** मनमोकळेपणे व दिल खुलासपणे संवाद साधण्यास आपणास कशी चालना दिली जाते?

## उपासना या संदर्भातील प्रश्न

**७.** प्रार्थना, पवित्र मिस्सा व इतर उपासना ह्यामध्ये एकत्रित प्रवास करण्यासाठी कशा प्रकारे प्रवृत्त केले जाते?

## मिशनकार्यात सक्रिय सहभाग या संदर्भातील प्रश्न

**८.** ख्रिस्तसभेच्या मिशन कार्यात सक्रिय सहभाग दर्शविण्यास आपण कशा प्रकारे बांधिलकी दाखवतो ?

## अधिकाराचा वापर व निर्णय प्रक्रिया या संदर्भातील प्रश्न

९. सांघिक भावना जोपासून आपल्या धर्मग्रामात अधिकाराचा वापर कशाप्रकारे केला जातो?

१०. पवित्र आत्म्याशी आज्ञाधारक राहून सहप्रवासाच्या कार्य पद्धतीत व निर्णय प्रक्रियेत पारख कशा प्रकारे केली जाते?

(लहान मुले, युवक-युवती, स्त्रि-पुरुष ह्यांच्या वयानुसार दोन गट आणि ज्येष्ठ नागरिक अशा गटांमध्ये वरील प्रश्नांवर आपले अनुभव कथन, आपली मतं, आपल्या सुचना गटवार लिहून घेतल्या जातील.)

**शेवटी धर्मगुरु आशीर्वाद देतील आणि अंतीम गीताने अधिवेशनाची सांगता होईल.**

**अंतिम गीत :** साल्वे मरिया / प्रणाम प्रणाम तुजला मरिया / मरिया तुला प्रणाम

# गावपरिवारात सिनड २०२१-२३ चर्चासत्र : वेळापत्रक

गावात चर्चासत्र संध्याकाळी ७.०० वा. सुरु होईल. सर्व भाविकांनी गावात ठरलेल्या जागी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती

| | |
|---|---|
| सोमवार ८ नोव्हेंबर | नायगांव ख्रिश्चनआळी |
| मंगळवार ९ नोव्हेंबर | नायगांव कोळीवाडा |
| बुधवार १० नोव्हेंबर | सिलचीवाडी आणि पालीबंदर |
| गुरुवार ११ नोव्हेंबर | खोचिवडा |
| शुक्रवार १२ नोव्हेंबर | करजिभाट |
| सोमवार १५ नोव्हेंबर | वडवली - सारबंदी |
| मंगळवार १६ नोव्हेंबर | लांबवाडी - भंदोडी |
| बुधवार १७ नोव्हेंबर | चौकवाडी आणि गरोडी |
| गुरुवार १८ नोव्हेंबर | शेनोडी - पोंडेवाडी |
| शुक्रवार १९ नोव्हेंबर | किरवली |



## सिनडसाठी प्रार्थना

हे पवित्र आत्म्या,
तुझ्या नावाने एकत्र येऊन
आम्ही तुझ्यासमोर उभे राहतो.
तू आमचा एकमेव मार्गदर्शक आहेस.
आमच्या हृदयात तू वस्ती कर;
आम्ही पुढे कसे जावे
याबद्दल आम्हाला मार्गदर्शन कर
आणि त्या मार्गाशी आम्हांला एकनिष्ठ ठेव.
आम्ही दुर्बळ आणि पापी आहोत;
अस्थिरतेपासून आम्हाला दूर ठेव;
अज्ञानाने आमचा मार्ग भ्रष्ट होऊ देऊ नकोस,
पक्षपाताचा आमच्या कृतीवर प्रभाव पडू देऊ नकोस.
हे पवित्र आत्म्या,
तुझ्यामध्ये आम्हाला आमचे ऐक्य पाहू दे;
म्हणजे आम्ही शाश्वत जीवनाकडे एकत्र वाटचाल करू
आणि सत्याच्या व योग्यतेच्या मार्गापासून
आम्ही भरकटणार नाही.
पिता आणि पुत्र ह्यांच्या ऐक्यात
तू सर्वत्र आणि सर्वकाळ कार्य करतोस
त्या तुझ्याकडे हे सर्व आम्ही मागतो, आमेन.

सिनड डेस्क : synod2023palle@gmail.com

Neelam 9881091320